महत्त्वाचे

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

नेरुळ : राहुल शिक्षण प्रसारक मंडळातर्फे ७९ वा स्वातंत्र्यदिन नागोठणे, खारघर, तळोजा, सीबीडी बेलापूर येथील सर्व कॅम्पसवर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये डॉ. नेल्सन मंडेला आश्रम शाळा, डॉ. जी. के. डोंगरगावकर आंतरराष्ट्रीय शाळा, सिद्धार्थ मल्टिपर्पज आंतरराष्ट्रीय शाळा, सत्याग्रह ज्युनियर कॉलेज, सत्याग्रह कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डॉ. जी. के. डोंगरगावकर विधी महाविद्यालय आणि सत्याग्रह शिक्षण महाविद्यालय यांनी सहभाग नोंदविला. प्रारंभी, खारघर सेक्टर ३३ येथील सत्याग्रह भवन व तळोजा येथील संविधान वन येथे ॲड. राजरत्न डोंगरगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच स्थानिक सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आई गोवर्धनी माता मंदिराचा १८ वा जीर्णोद्धार सोहळा संपन्न

नेरुळ : श्री कृष्णाष्टमी निमित्त बेलापूर किल्ले गावठाण येथील आई गोवर्धनी माता मंदिराचा १८ वा जीर्णोद्धार सोहळा विधिवत आणि धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी मंदिरात शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दरम्यान, भक्तांची सर्व संकटे दूर होऊन त्यांना सुख, शांती आणि समृद्ध जीवन लाभो, अशी प्रार्थना आई गोवर्धनी मातेला केल्याचे आ. मंदा म्हात्रे यांनी सांगितले. सुमारे ३०० वर्षांपूर्वीचे पुरातन पेशवेकालीन आई गोवर्धनी माता मंदिर आहे. नवी मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण पंचक्रोशातील भक्तांना नवसाला पावणारी आई गोवर्धनी माता प्रसिद्ध आहे. मंदिराच्या पाठीमागे विस्तीर्ण समुद्र असून या पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार १८ वर्षांपूर्वी उद्योजक विजय म्हात्रे व आ. मंदा म्हात्रे यांच्याहस्ते करण्यात आला होता.

पावसाच्या पाण्याने मालवणीत गटारे तुंबली

मालाड : मालाड पश्चिमेतील मालवणी २ नंबर येथील गटारे पावसाच्या पाण्याने तुंबली आहेत.साने गुरुजीलगतच्या गटारांची स्वच्छता नीट होत नसल्याने पावसाच्या पाण्याने गटारे तुंबली व घाण पाणी पूर्ण रस्त्यावर साचल्याने नागरिकांना येथून घाण पाण्यातून ये-जा करावी लागत आहे. तसेच लगतच खासगी रुग्णालय असल्याने रुग्णांच्या आरोग्यावर याचा परिणाम होत आहे. शिवअंगण इमारत तसेच सनराईझ इमारतीतील रहिवाशांना तसेच परिसरातील नागरिकांना या घाण पाण्यातूनच ये-जा करणे भाग पडत आहे.याबाबत महापालिकेत अनेक लोकांनी माहिती देऊनही महापालिका पी उत्तर विभागातील अधिकारी व कर्मचारी दिखाव्याची सफाई करून निघून जातात. जर यातील संपूर्ण गाळ उपसला तर पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल. मात्र तसे होत नसल्याने थोडा जरी पाऊस झाला तरी पाणी साचते व घाण पाण्यामुळे दुर्गंधीचा त्रास होतो. याशिवाय मच्छरांची संख्या वाढल्याने रोगराई पसरण्याची भीती वर्तवली जात आहे.

अल्पवयीन मुलीचे अश्लील व्हिडीओ व्हायरल करून बदनामी

मुंबई : पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीचे अश्लील व्हिडीओ व्हायरल करून मित्राने बदनामी केल्याचा प्रकार विक्रोळीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी मुलीच्या आईच्या तक्रारीनंतर सिद्धांत नावाच्या आरोपी मित्राविरुद्ध पार्कसाईट पोलिसांनी विनयभंगासह पोक्सो आणि आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे. इंस्टाग्रामवर झालेल्या ओळखीतून त्या दोघांत मैत्री झाली होती. अलीकडेच त्याने तिला व्हिडीओ कॉल करुन तिचे छोट्या कपड्यावरील व्हिडीओ काढले होते. ते व्हिडीओ त्याने तिच्यासह तिच्या काही मित्रांना पाठवून बदनामीचा प्रयत्न केला. हे व्हिडीओ पाहून तिला प्रचंड मानसिक धक्का बसला होता. जून ते ऑगस्टदरम्यान हा प्रकार घडला होता. हा प्रकार मुलीकडून तिच्या आईला समजताच पार्कसाईट पोलिसांत तक्रार देण्यात आली. या तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेत आरोपीच्या अटकेसाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या गुन्ह्यांत स्थानिक पोलिसांच्या सायबर सेलकडून तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

भूमिगत मुख्य मलनि:सारण वाहिनीचे घाण पाणी रस्त्यावर

कांदिवली : कांदिवली पश्चिमेला न्यू लिंक रोडवरील मुख्य भूमिगत मलनि:सारण वाहिनीचे घाण पाणी पहाटेपासून मोठ्या प्रमाणात रस्त्यावरून वाहू लागले आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पहाणी केली. गळतीच्या ठिकाणी लोखंडी बेरिकेड्स ठेवले. रस्त्यावर पाणी साचू नये म्हणून पंप लावले. मोठ्या प्रमाणात घाण पाणी मुख्य मार्गावरून वाहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन वाहन चालकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.न्यु लिंक रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते.मेट्रो स्टेशनच्या खालील मार्गावरील भूमिगत मलनि:सारण वाहिनीचे घाण पाणी पहाटेपासून मोठ्या प्रमाणात रस्त्यावरून वाहू लागले. पाण्याचे प्रमाण जास्तच असल्याने दुर्गंधी पसरली असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.

नवी मुंबई : पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहने बंद पडण्याच्या घटना घडल्या. (छाया : सुमित रेणोसे)

नवी मुंबईत मुसळधार

१३४.६७ मिमी पावसाची नोंद : दोन झाडे कोसळली

नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा

शुक्रवारी रात्रभर नवी मुंबईत मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शहरातील महामार्ग तसेच नेहमीची ठिकाणे पाण्याखाली गेली होती. रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहने अडकून पडली होती.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० ते १६ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० या २४ तासांच्या कालावधीत सरासरी १३४.६७ मिमी पावसाची नोंद झाली. तर शनिवारी दिवसभर २५.६ मिमी पावसाची नोंद झाली.

शुक्रवारी रात्रीपासून शनिवार सकाळपर्यंत बेलापूर विभागात १४०.२० मिमी, नेरुळमध्ये १४६.४० मिमी, वाशीत १३३ मिमी, कोपरखैरणेत तब्बल १७२.२० मिमी, ऐरोलीत ११३ मिमी तर दिघा विभागात १०३.३३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुसळधार पावसामुळे नवी मुंबई जलमय झाली होती. ठाणे -बेलापूर, सायन -पनवेल महामार्गावर पाणी साचले होते. पण कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवावली नाही. मुसळधार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता.

नवी मुंबई : तुर्भे एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये पाणी घुसले होते.

शनिवारी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण नवी मुंबईत आनंद आणि उत्साहाचे वातावरण होते. मात्र, अधूनमधून पावसाची हजेरी सुरू होती. सकाळी ८.३० ते संध्याकाळी ६.३० पर्यंत सरासरी २५.६ मिमी पावसाची नोंद झाली.

मुसळधार पावसामुळे नेरुळ आणि बेलापूर येथे प्रत्येकी एक झाड कोसळले. सुदैवाने यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही.

उत्सव आणि पावसाच्या संगमामुळे गोविंदांचा आनंद द्विगुणित झाला असला तरी प्रेक्षकांची मात्र तारांबळ उडाली. मोठी गर्दी, वाहतूक कोंडी व रस्त्यावरील पाण्यामुळे नागरिकांना कार्यक्रम पाहताना अडचणींचा सामना करावा लागला.

नवी मुंबईत संगिताच्या तालावर थिरकली तरुणाई

नवी मुंबई : पुढारी वृत्तसेवा

'गोविंदा रे गोपाळा'चा जयघोष... तरुणाईचा बेधुंद जल्लोष... नागरिकांची गर्दी... गोविंदा पथकांच्या थरांवर वरुणराजाने लावलेली हजेरी ... अशा वातावरणात शनिवारी नवी मुंबईत गोपाळकाला उत्साहात साजरा करण्यात आला. चौकाचौकांत, गल्ल्यांमध्ये आणि सोसायट्यांमध्ये बाळगोपाळांच्या उत्साहात दहीहंडी फोडण्यात आल्या.

महापालिकेची निवडणूक होणार असल्यामुळे राजकीय नेत्यांनी दहीहंडी उत्सव मंडळांना हात सैल सोडल्याने यंदा मंडळांची संख्याही वाढलेली पहावयास मिळली. यंदा मुंबईकरांनीही नवी मुंबईतील दहीहंड्यांवर लक्ष केंद्रित केले होते. नवी मुंबईत सकाळपासूनच वरुणराजाने हजेरी लावल्याने गोविंदा पथके खुश होती. ऐरोलीत सुनील चौगुले स्पोर्टस असोसिएशनतर्फे आयोजीत दहिहंडीला सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी, मानसी नाईक, लावणीसम्राज्ञी गौतमी पाटील, गायक राजू राठोड, अभिनेत्री अस्मिता सुर्वे व धनश्री दळवी यांनी उपस्थिती दर्शवली. साईनाथ वाडीत १५ लाख ५५,५५५ रुपयांची दहीहंडी लावली होती. यावेळी गौतमी पाटील हिचे सादरीकरण झाले.

नवी मुंबई : एरोलीतील दहीहंडीला सलामी दिल्यानंतर जल्लोष करताना पथक.

मराठवाड्यासह राज्यभर पावसाचे थैमान

नद्यांना पूर, धरणे ओव्हरफ्लो : चौघांचा बळी : सतर्कतेचा इशारा

मुंबई, रायगड, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर : टीम पुढारी

काही दिवसांच्या विश्रांतीनंतर राज्यात परतलेल्या पावसाने मराठवाड्यासह अनेक भागांत अक्षरशः थैमान घातले आहे. गेल्या ४८ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक प्रमुख धरणे भरली आहेत. या पावसामुळे नांदेड, धाराशिव आणि बीड जिल्ह्यात दुर्घटना घडल्या असून आतापर्यंत चौघांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. प्रशासनाने अनेक ठिकाणी सतर्कतेचा इशारा दिला असून, एनडीआरएफची पथकेही तैनात करण्यात आली आहेत.

जनजीवन विस्कळीत

मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांना पावसाने झोडपून काढले आहे. नांदेड, बीड, धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यांत परिस्थिती गंभीर बनली आहे. कंधार तालुक्यातील कोटबाजार येथे घराची जीर्ण भिंत कोसळून शेख नाशेर शेख अमीन आणि त्यांच्या पत्नी शेख हसीना यांचा ढिगाऱ्याखाली दबून मृत्यू झाला. घरकुलाचे अनुदान न मिळाल्याने हे दाम्पत्य पडक्या घरात राहात होते, तिथेच त्यांच्यावर काळाने घाला घातला. किनवट तालुक्यात पुराच्या पाण्यातून स्कूल बस नेण्याच्या चालकाच्या हट्टीपणामुळे बस वाहून गेली. सुदैवाने बसमध्ये विद्यार्थी नव्हते. मात्र चालक प्रेमसिंग पवार याचा मृतदेह सापडला आहे. बीड जिल्ह्यातील तब्बल १७ महसूल मंडळांमध्ये (पाली, चौसाळा, केज, पाटोदा इत्यादी) अतिवृष्टीची नोंद झाली आहे. केज तालुक्यातील मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या तुफान पावसामुळे केवळ ४८ तासांत पाणीसाठा ३६ टक्केवरून थेट ८५ टक्क्यांवर पोहोचला. त्यामुळे शनिवारी दुपारी धरणाचे चार दरवाजे उघडून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

दिवाळे कोळीवाड्यात रंगला जन्माष्टमी सोहळा

नवी मुंबई: पुढारी वृत्तसेवा

नवी मुंबईतील समस्त दिवाळे ग्रामस्थ मंडळ यांच्यातर्फे जन्माष्टमीच्या निमित्ताने दिवाळे कोळीवाड्यातील हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १० ते १६ ऑगस्ट या दरम्यान झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हरिनाम सप्ताहात शुक्रवारी (ता. १५) रोजी कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी आबालवृदांसह महिलांच्या उपस्थितीत पारंपारिक पद्धतीने श्रीकृष्ण जन्माष्ठमीचा उत्सव फुलांची उधळण करीत साजरा करण्यात आला. यावेळी मंदिरात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

दरम्यान, सप्ताह काळात दैनंदिन सकाळची काकडा आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, कीर्तन, सुश्राव्य बॅण्ड वादन व रात्री पंचक्रोशीतील गावांचा भजनाचा कार्यक्रम असा दिनक्रम होता. सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहाने संपूर्ण गाव भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

प्रभाग निवडणूक अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई यांचे कार्यालय
कक्ष क्र. २०२, दुसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

दिनांक : १३/०८/२०२५

जाहिर निवडणूक प्रकटण

सोनिया महिला ग्राहक सहकारी संस्था मर्या., एम. जी. १११, वात्स्यल्य नगर, एस. जी. बर्वे मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीसाठी तपशीलवार निवडणूक कार्यक्रम दिनांक १४ / ०८ / २०२५ पासून जाहिर करीत आहे. सदर कार्यक्रमाची प्रत प्रभाग निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई, कक्ष क्र. २०२, दुसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४ तसेच संस्थेचे कार्यालयात प्रसिद्ध करणेत आलेला आहे. संस्थेच्या सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

(संतोष वाघमारे)
दिनांक : १३/०८/२०२५ शिक्का सोनिया महिला ग्राहक सहकारी संस्था मर्या., मुंबई
स्थळ : कोकण भवन निवडणूक निर्णय अधिकारी, तथा
मुख्य लिपिक अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था,
एम-विभाग, मुंबई.

प्रभाग निवडणूक अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई यांचे कार्यालय
कक्ष क्र. २०२, दुसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

दिनांक : १३/०८/२०२५

जाहिर निवडणूक प्रकटण

आय. आय. पी. एस. एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसा. लि., गोवंडी स्टेशन रोड, देवनार, मुंबई - ४०० ०८८ या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२४- २५ ते २०२९-३० या कालावधीसाठी तपशीलवार निवडणूक कार्यक्रम दिनांक १४ / ०८/२०२५ पासून जाहिर करीत आहे. सदर कार्यक्रमाची प्रत प्रभाग निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई, कक्ष क्र. २०२, दुसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४ तसेच संस्थेचे कार्यालयात प्रसिद्ध करणेत आलेला आहे. संस्थेच्या सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०८/२०२५ शिक्का (आर. एम. दोडे)
स्थळ : कोकण भवन आय. आय. पी. एस. एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसा. लि., मुंबई.
निवडणूक निर्णय अधिकारी,तथा से.नि.ले.प.

प्रभाग निवडणूक अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई यांचे कार्यालय
कक्ष क्र. २०२, दुसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

दिनांक : १३/०८/२०२५

जाहिर निवडणूक प्रकटण

श्री महालक्ष्मी सहकारी पतपेढी मर्या., सत्यनारायण सेवा सोसायटी, खारदेव नगर, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२४- २५ ते २०२९-३० या कालावधीसाठी तपशीलवार निवडणूक कार्यक्रम दिनांक १४/०८/२०२५ पासून जाहिर करीत आहे. सदर कार्यक्रमाची प्रत प्रभाग निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई, कक्ष क्र. २०२, दुसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४ तसेच संस्थेचे कार्यालयात प्रसिद्ध करणेत आलेला आहे. संस्थेच्या सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

(संतोष वाघमारे)
दिनांक : १३/०८/२०२५ शिक्का श्री महालक्ष्मी पतपेढी मर्या., मुंबई
स्थळ : कोकण भवन निवडणूक निर्णय अधिकारी, तथा मुख्य लिपिक अधिन
उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई.

प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एन विभाग, मुंबई.
कक्ष क्रमांक ३११, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४.

जाहीर निवडणूक प्रकटन

श्री निनकोदेवी सहकारी पतसंस्था मर्यादित, खोली क्र. १/४, प्रभा निवास, नारायण भावसार इस्टेट, काजुटेकडी, घाटकोपर (प), मुंबई-४०० ०८४, या संस्थेचा सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी निवडणूक कार्यक्रम **दिनांक १८/०८/२०२५** पासून सुरु करीत आहे. सदर कार्यक्रमाची प्रत प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, एन-विभाग मुंबई, कक्ष क्रमांक ३११, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४ या ठिकाणी तसेच संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

सही/-
(ज्योती मोहिते)
शिक्का निवडणूक निर्णय अधिकारी,
श्री निनकोदेवी सहकारी पतपेढी मर्यादित

Skill India कौशल भारत-कुशल भारत
GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF SKILL DEVELOPMENT& ENTREPRENEURSHIP
REGIONAL DIRECTORATE OF SKILL DEVELOPMENT & ENTREPRENEURSHIP, SION, MUMBAI- 400 022.
Directorate General of Training
Email : nsti-mumbai@dgt.gov.in / nstiw-mumbai@dgt.gov.in Website : nstimumbai.dgt.gov.in / nstiwmumbai.dgt.gov.in

The Regional Directorate of Skill Development & Entrepreneurship (RDSDE) Maharashtra, Government of India, Ministry of Skill Development & Entrepreneurship is called for admission of Craftsmen Training Scheme (CTS/ITI) under NCVET at NSTI, Chunabhatti, Sion(E), Mumbai & NSTI(Women), Dadar(W), Mumbai for the Session 2025-2026 commencing from 1st Sept, 2025 under following trades:-

CTS/ITI ADMISSION FOR -2025-26 OPEN Hurry up Admission Open Now

Courses offered at NSTI, Chunabhatti, Sion (E), Mumbai-22

Sl.	Particulars of Trades	Duration
1	Additive Manufacturing Technician (3D Printing) (NSQF Level - 3)	1 Year
2	Solar Technician (Electrical) (NSQF Level - 3)	1 Year
3	Internet of Things (Smart Health Care) (NSQF Level - 3)	1 Year
4	Artificial Intelligence & Programming Assistant (NSQF Level - 3.5) (AIPA Trade preferably 12th Passed)	

Courses offered at NSTI(Women), Dadar(W), Mumbai-28

Sl.	Particulars of Trades	Duration
1	Computer Operator & Programming Assistant (COPA) (NSQF Level- 3)	1 Year
2	Cosmetology (NSQF Level - 3)	1 Year
3	Dress Making (NSQF Level - 3)	1 Year
4	Architectural Draughtsman (NSQF Level - 4)	2 Year
5	Artificial Intelligence & Programming Assistant (NSQF Level-3.5) (AIPA Trade preferably 12th Passes)	1 Year

Admissions are Open on 1st come 1st serve basis up to 31th August 2025

Entry Qualification: **1** Passed 8th Class examination or equivalent for Dress Making. **2.** AIPA Trade preferably 12th passed or equivalent. **3.**For all other courses Passed 10th Class examination with Science & Mathematics or its equivalent. **AGE:** - Candidates should be not less than 14 years of age as on 1st Sept 2025.

How to Apply : Candidates desiring admission may visit www.nstimumbai.dgt.gov.in & www.nstiwmumbai.dgt.gov.in OR Walk in to respective NSTI for admission OR For other details Contact to: NSTI, Sion (E),Mumbai: 9699275218 / 9699461136 & NSTI (W),Dadar(W), Mumbai: 8082783876 / 9320892764
REGIONAL DIRECTOR
RDSDE MAHARASHTRA

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
होम स्ट्रीट, मुंबई (३१७३०), फोर्ब्स बिल्डिंग, होम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-१
संपर्क क्र. : ९९६०७१३३७१, **ई-मेल आयडी :** ubin0531731@unionbankofindia.bank

परिशिष्ट IV ताबा सूचना [नियम-८ (१)] (स्थावर मालमत्तेसाठी)

याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली सही करणारे, **युनियन बँक ऑफ इंडिया**, होम स्ट्रीट शाखा, फोर्ब्स बिल्डिंग, चरणजीत राय मार्ग, फोर्ट, मुंबई येथील प्राधिकृत अधिकारी यांनी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (दुसरा) कायदा, २००२ (कायदा क्र. ५४ ऑफ २००२) च्या कलम १३(१२) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार **सुजाता भानुदास कदम आणि सनिल सुदाम गायकर यांना दिनांक ०६.०६.२०२५** रोजीची मागणी नोटीस बजावून, नोटीसमध्ये नमूद केलेली **रु. ३७,७२,५७३.४६ (अक्षरी रुपये सदतीस लाख बाहत्तर हजार पाचशे त्र्याहत्तर आणि सेहेचाळीस पैसे फक्त)** इतकी रक्कम, सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्याची मागणी केली होती.

कर्जदारांनी उपरोक्त रक्कम परतफेड करण्यास कसूर केल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, खाली सही करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्याने सदर कायद्याच्या कलम १३(४) सह नियम ८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **दिनांक १३ ऑगस्ट २०२५** रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे ताकीद देण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. मालमत्तेवरील कोणताही व्यवहार हा युनियन बँक ऑफ इंडिया, होम स्ट्रीट शाखेच्या **रु. ३७,७२,५७३.४६ (अक्षरी रुपये सदतीस लाख बाहत्तर हजार पाचशे त्र्याहत्तर आणि सेहेचाळीस पैसे फक्त)** आणि त्यावरील व्याजाच्या रकमेच्या प्रभाराच्या अधीन असेल.

तारण मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात, कर्जदारांचे लक्ष उपरोक्त कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन:

फ्लॅट क्र. ७०३, सातवा मजला, क्षेत्रफळ ५०३ चौरस फूट, शिवगंगा अपार्टमेंट नावाच्या इमारतीमधील, जुना सर्व्हे क्र. १३०, नवीन सर्व्हे क्र. ८८, हिस्सा क्र. ०४, मौजे कांचनगाव, डोंबिवली पूर्व, तालुका-कल्याण, जिल्हा-ठाणे, पिन - ४२१२०१, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता.**चतु:सीमा :- उत्तरेस :** विनायक निवास **दक्षिणेस :** अंतर्गत रस्ता **पूर्वेस :** मोकळा भूखंड **पश्चिमेस :** मोकळा भूखंड

सही/-
दिनांक : १३.०८.२०२५ प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई युनियन बँक ऑफ इंडिया

इंडिया एसएमई ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (ISARC)
(ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची उपकंपनी)
नोंदणीकृत कार्यालय: द रुबी, ११ वा मजला, नॉर्थ-वेस्ट विंग, प्लॉट क्र. २९, सेनापती बापट मार्ग, दादर पश्चिम, मुंबई - ४०० ०२८ सीआयएन : U67190MH2008PLC181062

ई-लिलाव व विक्रीसाठी सार्वजनिक सूचना - (परिशिष्ट - IV -) (नियम ८(६))

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (२००२ चा ५४) (सरफेसी कायदा) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, २००२ (नियम) च्या नियम ८(६) च्या नुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्यांना आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार(रांना) यांना सूचित करण्यात येते की, इंडिया एसएमई असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (आयएसएआरसी-कॅनरा बँक-I/२०१३-१४ ट्रस्टचा विश्वस्त म्हणून कार्यरत) (**ISARC**) आणि जेएम फायनान्शियल असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (जेएमएफएआरसी-देना बँक मार्च २०१४-ट्रस्टचा विश्वस्त म्हणून कार्यरत) (**JMFARC**) (एकत्रितपणे सुरक्षित धनको म्हणून संदर्भित) यांच्याकडे गहाण/प्रभारित केलेल्या खालील स्थावर मालमत्ता, ज्यांचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोंच्या वतीने **ISARC** च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, त्यांची विक्री जसे आहे जेथे आहे, जसे आहे जसे स्थितीत, जे काही आहे ते आणि कोणताही आधार नाही या तत्वावर दिनांक ०८.०९.२०२५ रोजी करण्यात येईल.

ही विक्री, **ISARC** (कॅनरा बँकेचे अभिहस्तांकिती) यांना दिनांक ३१.०७.२०२५ रोजी देय असलेली **एकूण रक्कम रु. २०९,२०,७२,२४८/- (अक्षरी रुपये दोनशे नऊ कोटी वीस लाख बाहत्तर हजार दोनशे अठ्ठेचाळीस फक्त)** आणि **JMFARC** यांना दिनांक **३१.१२.२०२३ रोजी देय असलेली एकूण रक्कम रु.११६,१९,७४,७५६/- (अक्षरी रुपये एकशे सोळा कोटी एकोणीस लाख चौऱ्याहत्तर हजार सातशे छप्पन्न फक्त)** तसेच पुढील व्याज, आकस्मिक खर्च, शुल्क इत्यादींच्या वसुलीसाठी करण्यात येत आहे. ही रक्कम **मेहेक ओव्हरसीज लि. (कर्जदार) आणि १. श्रीमती दिप्ती जतीन ठक्कर (स्वर्गीय श्री. जतीन ठक्कर यांच्या कायदेशीर वारस आणि पत्नी - जामीनदार/गहाणखतदार) २. श्री. साहिल ठक्कर (स्वर्गीय श्री. जतीन ठक्कर यांचे कायदेशीर वारस आणि मुलगा - जामीनदार/गहाणखतदार) ३. श्रीमती दृष्टी ठक्कर (स्वर्गीय श्री. जतीन ठक्कर यांच्या कायदेशीर वारस आणि मुलगी - जामीनदार/गहाणखतदार) ४. श्रीमती शकुंतला जे. ठक्कर (स्वर्गीय श्री. जितेंद्र पी. ठक्कर यांच्या कायदेशीर वारस आणि पत्नी - जामीनदार/गहाणखतदार) ५. श्रीमती डिंपल रघुवंशी (स्वर्गीय श्री. जितेंद्र पी. ठक्कर यांच्या कायदेशीर वारस आणि मुलगी - जामीनदार/गहाणखतदार),** (एकत्रितपणे जामीनदार आणि गहाणखतदारांचे कायदेशीर वारस म्हणून संदर्भित) यांच्याकडून देय आहे.

स्थावर मालमत्तेचे सविस्तर वर्णन, तपासणीची तारीख, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम (एचऊ) खालीलप्रमाणे असेल:

लॉट क्र.	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत	बयाणा रक्कम (EMD)
लॉट -I	निवासी फ्लॅट क्र. ९०१ आणि ९०२; ९ वा मजला, बी-विंग, इमारत क्र. २२, टिळकधाम सी.एच.एस. लि., टिळकनगर, चेंबूर, मुंबई - ४०००८९ (विलीन केलेली मालमत्ता)	रु. ३,२५,००,०००/-	रु.३२,५०,०००/-
ई-लिलावाची तारीख आणि वेळ: दिनांक: ०८.०९.२०२५, वेळ: दुपारी ०२.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत. शेवटच्या पाच मिनिटांत बोली लावल्यास प्रत्येक वेळी पाच मिनिटांची स्वयंचलित वाढ.			
बयाणा रक्कम (EMD) जमा करण्याची तारीख: दिनांक ०४.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी, सायंकाळी ५ वाजेपर्यंत.			
मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ: दिनांक ०१.०९.२०२५, सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत.			
संपर्क व्यक्ती/क्रमांक: श्री. संजय टेंबे (**CM**), मोबाईल: ८००७११२४०३			

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तीसाठी, कृपया इंडिया एसएमई असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि. च्या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या: **www.isarc.in** बोली लावण्यासाठी , **www.bankeauctions.com, C1** इंडिया लि., हेल्पलाइन: +९१-७२९१९८११२४-२५-२६, +९१-८८६६६८२९३७ वर लॉग ऑन करा.

सही/- अधिकृत अधिकारी,
इंडिया एसएमई असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (ISARC) लिमिटेड (ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ("AIIL") ची उपकंपनी) आयएसएआरसी - कॅनरा बँक -I/ २०१३-१४ ट्रस्टचा विश्वस्त म्हणून कार्यरत
दिनांक: १७.०८.२०२५
ठिकाण: मुंबई